# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक 19 /07/2019**

**सभा सुचना क्रं. 2  सायं 4.30 वा.**

<table>
<tr><th></th><th>विषयाचे नाव</th><th>मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय</th></tr>
<tr><td>1.</td><td>मागील मा. सर्वसाधारण सभा दि. 20/06/2019 रोजीचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.</td><td>ठराव :- मागील सर्वसाधारण सभा दि. 20/06/2019 रोजीचे कायम केलेले इतिवृत्त दुरूस्तीसह मंजूर करणेंत येत आहे.<br>अनुमोदक :- (पंकज चोरघे)   सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर.</td></tr>
<tr><td>2.</td><td>प्रश्नोत्तरे</td><td></td></tr>
<tr><td>3.</td><td>शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव.</td><td></td></tr>
<tr><td>4.</td><td>स्थायी समितीच्या सदस्यपदी असलेले 1)श्रीम. सुषमा संजय लोपीस 2)श्री.किशोर नाना पाटील 3)श्रीम.दिक्षा दिपेश घरत 4)श्री. अतुल रमेश साळुंखे 5)श्रीम. विद्या चेतन पाटील 6)श्री. वैभव सुदाम पाटील 7)श्री. दिलीप यशवंत गोवारी 8)श्री.महेश हरी पाटील हे निवृत्त होत असल्याने त्यांच्या रिक्त होणाऱ्या 08 जागांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 20 (5) अन्वये स्थायी समिती सदस्य म्हणून नव्याने नेमणुका करणे.</td><td>ठराव :- गटनेते, बहुजन विकास आघाडी यांचे मार्फत स्थायी समितीवरील 08 रिक्त जागांसाठी खालील 08 सदस्यांची शिफारस प्राप्त झाली आहे.<br>१) हार्दीक रविंद्र राऊत 2) प्रशांत दत्तात्रय राऊत 3) प्रकाश नथुराम चौधरी 4) शुभांगी राजेश गायकवाड 5) ॲड. ज्योती मच्छिंद्र धोंडेकर 6) दिलीप यशवंत गोवारी 7) वैभव सुदाम पाटील 8) सचिन संभाजी देसाई<br>उपरोक्त आठही सदस्यांची स्थायी समिती सदस्य म्हणून नेमणूक करण्यास सभा मंजूरी देत असून नवनिर्वाचीत सदस्यांसह 16 सदस्यीय स्थायी समिती खालीलप्रमाणे<br>स्थायी समिती सदस्य 2019-20<br><table><tr><th>अ.क्र.</th><th>सदस्यांचे नाव</th><th></th><th>अ.क्र.</th><th>सदस्यांचे नाव</th></tr><tr><td>1</td><td>सुदेश प्रभाकर चौधरी</td><td></td><td>9</td><td>हार्दीक रविंद्र राऊत</td></tr><tr><td>2</td><td>उमेश दत्तात्रेय नाईक</td><td></td><td>10</td><td>प्रशांत दत्तात्रय राऊत</td></tr></table></td></tr>
</table>

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>
<table>
<tr><td>3</td><td>पंकज भास्कर ठाकूर</td><td></td><td>11</td><td>प्रकाश नथुराम चौधरी</td></tr>
<tr><td>4</td><td>अफिफ जमिल शेख</td><td></td><td>12</td><td>शुभांगी राजेश गायकवाड</td></tr>
<tr><td>5</td><td>नितीन दिनानाथ राऊत</td><td></td><td>13</td><td>ॲड. ज्योती मच्छिंद्र धोंडेकर</td></tr>
<tr><td>6</td><td>पंकज पद्माकर पाटील</td><td></td><td>14</td><td>दिलीप यशवंत गोवारी</td></tr>
<tr><td>7</td><td>कल्पेश नारायण मानकर</td><td></td><td>15</td><td>वैभव सुदाम पाटील</td></tr>
<tr><td>8</td><td>स्वप्निल अविनाश बांदेकर</td><td></td><td>16</td><td>सचिन संभाजी देसाई</td></tr>
</table>
अनुमोदक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे) सुचक :- ( अब्दुल हक सुलेमान पटेल)<br>
ठराव सर्वानुमते मंजूर
</td>
</tr>
<tr>
<td>5.</td>
<td><u>श्री.कुणाल प्रल्हाद लाड यांस वारसा हक्काने सफाई कामगार या पदावर नियुक्ती करणेबाबत.</u></td>
<td><u>निर्णय/ठराव:-</u> वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती -सी, चंदनसार, विरार विभाग आस्थापनेवरील कर्मचारी श्री. नगीन शांतू लाड, सफाई कामगार हे दिनांक 31/01/2019 रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झाले असुन त्यांचा पुतण्या श्री. कुणाल प्रहलाद लाड हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक 21 ऑक्टोबर, 2011, शासन परिपत्रक दिनांक 26 फेब्रुवारी, 2014 व शासन निर्णय दिनांक 11 मार्च, 2016 मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>
अनुमोदक :- (यज्ञेश्वर पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>
ठराव सर्वानुमते मंजूर</td>
</tr>
<tr>
<td>6.</td>
<td><u>श्री. रविंद्र अर्जुन लाड यांस वारसा हक्काने सफाई कामगार या पदावर नियुक्ती करणेबाबत.</u></td>
<td><u>निर्णय/ठराव:-</u> वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती -सी, चंदनसार, विरार विभाग आस्थापनेवरील कर्मचारी श्रीमती अंबा अर्जुन लाड, सफाई कामगार हे दिनांक 31/01/2019 रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झाले असुन त्यांचा मुलगा श्री. रविंद्र अर्जुन लाड हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक 21 ऑक्टोबर, 2011, शासन परिपत्रक दिनांक</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | 26 फेब्रुवारी, 2014 व शासन निर्णय दिनांक 11 मार्च, 2016 मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br><br>**अनुमोदक :- (यज्ञेश्वर पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 7. | **<u>श्रीमती कपिला हिरा सोलंकी हिंस वारसा हक्काने सफाई कामगार या पदावर नियुक्ती देणेबाबत.</u>** | <u>निर्णय/ठराव:-</u> वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती -सी, चंदनसार, विरार विभाग आस्थापनेवरील कर्मचारी श्री. हिरा मोती सोलंकी, सफाई कामगार हे दिनांक 31/12/2018 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असुन त्यांची मुलगी श्रीमती कपिला हिरा सोलंकी हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक 21 ऑक्टोबर, 2011, शासन परिपत्रक दिनांक 26 फेब्रुवारी, 2014 व शासन निर्णय दिनांक 11 मार्च, 2016 मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (यज्ञेश्वर पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 8. | **<u>वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती सी चंदनसार आस्थापनेवरील कर्मचारी श्री. महेश किसन सोलंकी सफाई कामगार यांना स्वेच्छा निवृत्ती देणेबाबत.</u>** | <u>निर्णय/ठराव:-</u> वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती -सी, चंदनसार विरार विभाग आस्थापनेवरील कर्मचारी श्री. महेश किसन सोलंकी, सफाई कामगार यांना दि. 31/07/2019 रोजी मध्यान्होत्तर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 चा नियम 66 (1) अन्वये स्वेच्छा सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच श्री. महेश किसन सोलंकी, सफाई कामगार यांना स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर दयावयाचे अनुषंगिक लाभ अदा करणेस आजची ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (यज्ञेश्वर पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 9. | **<u>प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वॉर्ड नं. 105 मध्ये जुचंद्र येथील जुचंद्र नायगांव मुख्य रस्ता ते सोमेश्वर</u>** | **ठराव :-** वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करणेत आली. सदर कामात पक्के क्रॉस ड्रेनचे काम देखील करणे गरजेचे आहे. सबब आवश्यकतेनुसार क्रॉस ड्रेनची कामे देखील सदरच्या |

| | | |
|---|---|---|
| | **नगर पर्यंत रस्ता सिमेंट काँक्रीटने बांधणे कामाचे अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.** | अंदाजपत्रकात समाविष्ट करुन नव्याने प्रस्ताव प्रशासकीय व वित्तीय मंजूरीसाठी सादर करावा सबब सदरचा आलेला प्रस्ताव स्थगित करावा अशी आजची सभा ठरवित आहे<br>**अनुमोदक :- (कन्हैय्या भोईर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 10. | **प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.114 मध्ये किल्लाबंदर येथील आवलू उघाडी ते रामा तुंबडे यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे (फेज -3) कामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली वरील कामी तयार करणेत आलेल्या रु. 99,38,912/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस मा. आयुक्त हयांनी मा. सर्वसाधारण सभेपुढे शिफारस केली आहे. तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (प्रविण शेट्टी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 11. | **प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.107 मध्ये लोहिया नगर ते घाटाळ नगर मध्ये आर.सी.सी. नाला बांधणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव** :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली वरील कामी तयार करणेत आलेल्या रु. 3,19,98,904/-<br>इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (प्रविण शेट्टी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 12. | **प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.107 मध्ये लोहिया नगर येथील नाल्यावर आर.सी.सी स्लॅब बांधणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव** :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली वरील कामी करणेत आलेल्या रु.98,15,497/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (प्रविण शेट्टी ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 13. | **<u>प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.108 मधील होळी मच्छी मार्केट उघाडी ते विश्राम वाडी उघाडीपर्यंत आर.सी.सी नाला बांधणेकामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.</u>** | **ठराव** :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली वरील कामी तयार करणेत आलेल्या रु. 1,02,91,523/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस मा.आयुक्त हयांनी मा. सर्वसाधारण सभेपुढे शिफारस केली आहे. तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (प्रविण शेट्टी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 14. | **<u>प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.108 मधील वरचा माळा येथील कॅन्सर सेंटर जवळ आर.सी.सी नाला बांधणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.</u>** | **ठराव** :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली वरील कामी तयार करणेत आलेल्या रु.76,23,616/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस, मा.आयुक्त हयांनी मा.सर्वसाधारण सभेपुढे शिफारस केली आहे. तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (प्रविण शेट्टी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 15. | **<u>वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे उड्डाणपुलांची बांधकामे करणेकामी मान्यता देणेबाबत.</u>** | **प्रस्तावाचा निर्णय** :- प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करणेंत आली. वरील सर्व उड्डाणपुल विकसीत करणेसाठी MMRDA/राज्य शासन/केंद्र शासनास प्रस्ताव पाठविणेंत यावा. असे ही सभा ठरविते. ह्याबाबतची पुढील कार्यवाही मा.आयुक्त ह्यांनी करावी असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- (सुदेश चौधरी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 16. | **<u>सन 2019-20, 2020-21 व 2021-22 या वित्तीय वर्षात महानगरपालिका क्षेत्रात आवश्यकतेनुसार विविध व्यासाच्या जलवाहिन्या अंथरणेकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.</u>** | **<u>ठराव / निर्णय</u>** :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यात आले की, (1) सन 2019-20, 2020-21 व 2021-2022 या वित्तीय वर्षात महानगरपालिका क्षेत्रात आवश्यकतेनुसार विविध व्यासाच्या जलवाहिन्या अंथरणे कामी येणाऱ्या त्रिवार्षीक खर्च रु.6 कोटीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामाची निकड लक्षात घेता सदर कामाकरीता कमी कालावधीची जाहिर निविदा सूचना प्रसिध्दी करुन निविदा मागविण्यास व ठेकेदारांचे पॅनल तयार |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर निविदेअंतर्गत कामाच्या आवश्यकतेनुसार स्वतंत्र अंदाजपत्रक व प्रस्ताव तयार करुन त्यास मान्यता देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत.<br>2).सन 2019-20 साठी विकास निधी मधून पाणी पुरवठा शहरांतर्गत जलवाहिनी व्यवस्था या लेखाशिर्षावर अपुरी तरतूद असल्याने विकास निधी अंतर्गत सुरसी, राजावली ,सातिवली, खोलसापाडा,कामण बंधारे बांधणे, पाणी पुरवठा योजना राबविणे, देहरजी एन.पी.व्हि. भरणा व इतर नविन उद्भव हा प्रकल्प पूर्ण ठेव तयार करणे तयेच कवडास बंधाऱ्याची उंची तत्वावर राबविण्यास वाढविणे तसेच सुर्या नदिपात्रात 5 बंधारे बांधणे या लेखाशिर्षावर उपलब्ध तरतूद रु 80 कोटी मधून रु 5 कोटी तरतूद पुर्नविनियोजन करणेकामी सादर केलेल्या नमुना नं. 10 नूसार तरतूद पुर्नविनियोजन करण्यास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- ( रमेश घोरकना ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 17. | **वसई विरार शहर महानगरपालिका मार्फत 9 व्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा 2019 चे यशस्वी आयोजन करण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.** | प्रस्तावाचा **ठराव/निर्णय** - वरील विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली, प्रस्तावत नमुद प्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिका मार्फत 9 व्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन 2019 चे यशस्वी आयोजन करणे कामी रुपये 1 कोटी 80 लक्ष इतक्या खर्चास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. महानगरपालिकेच्या माध्यमातून प्रती वर्षी राष्ट्रीय पातळीवरील महापौर मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यांत येत आहे. व सदर स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात मे.आर्यन्ज स्पोर्टस पी आर ॲन्ड इव्हेंन्ट ह्याचा अत्यंत महत्वाचा वाटा असून त्यांच्या मार्फत या स्पर्धेच्या आयोजनाचा आर्थिक भार कमी करणेकामी प्रायोजक मिळविणेसाठी प्रत्येक स्पर्धेत सहाय्य असते. सबब आयोजनाचा आर्थिक भार कमी करणे व खर्चास बचत होण्याकरीता प्रायोजक मिळविणेकामी पुढील तीन वर्षासाठी मे.आर्यन्ज स्पोर्टस पी आर ॲन्ड इव्हेंन्ट यांना याद्वारे प्राधिकृत करण्यास मंजुरी देण्यांत येत आहे.<br>१) मॅरेथॉन स्पर्धेकरीता इव्हेंन्ट मॅनेजमेन्ट करणे, २) मॅरेथॉन स्पर्धाकरीता आर्टवर्क डिझाईन करणे, ३) मॅरेथॉन स्पर्धेकरीता सुरक्षा रक्षक (Security Guard) , बाऊन्सर (Bouncer) पुरविणे व सुरक्षतेचे साहित्य भाडेतत्वावर घेणे,४) मॅरेथॉन स्पर्धेकरीता किरकोळ साहित्य आवश्यकतेप्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| | | खरेदी करणे व इतर स्पर्धेच्या दिवशी लागणारे साहित्य भाडेतत्वावर घेणे व इत्यादी बाबी व मॅरेथॉन स्पर्धेकरीता आवश्यक असणारी इतर अनुषंगिक कामे यांचे स्वरुप निश्चित असून त्या सर्व अतंर्भुत बाबीकरीता 3 वर्षांकरीता ई-निविदा काढण्यांस ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या वर्षाकरीता ई-निविदा मागविण्यांत याव्यात व वर्षा निहाय वाढीव निर्देशांकानुसार होणारी रक्कम प्रतिवर्षी अंदाजीत वाढीव खर्च गृहीत धरुन मॅरेथॉन स्पर्धेचे यशस्वी आयोजन करणेकामी होणा-या प्रतिवर्षीचा खर्चाप्रमाणे सदर ई-निविदा काढण्यांत यावी. तसेच प्रतिवर्षी याबाबतची माहिती मा.महासभेच्या पटलावर ठेवण्यांत यावी.या स्पर्धेचे आयोजन यशस्वी करणेकामी वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ (रजि) यांची मदत वेळोवेळी घेते, वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळाचे सरचिटणीस श्री.प्रकाश वनमाळी व वसई विरार शहर महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती श्री.संदेश जाधव यांची मॅरेथॉन स्पर्धेच्या मुख्य समन्वयक पदी नियुक्ती करणेंस ही सभा बहुमताने मंजुरी देत आहे. स्पर्धेचे उत्तम प्रकारे नियोजन करणेकामी प्रस्तवात नमुद त्या बाबींसाठी वार्षीक ठेकेदार यांचे मंजुर ठेक्यातून साहित्य, चिज, वस्तु उपलब्ध करुन घेणे / कामे करुन घेणे तसेच उर्वरित व अनुषंगीक व आवश्यक बाबीसाठी,दरपत्रक /रोखीने spot खरेदी, निविदा व ई-निविदा प्रक्रीये द्वारे कार्यवाही करणेंस ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (प्रविण शेट्टी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

**नगरसचिव**
**वसई विरारशहर महानगरपालिका**